PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Kas
Year: 2010

Song: Don He Aahet Pele
Lyricist: Aarati Prabhu

दोन हे आहेत पेले
दोन हे आहेत पेले
आपुले नाही जणू
कोणता आहे तुझा
अन् कोणता माझा म्हणू
दोन हे आहेत पेले

दे तुझा झोकून घेतो
आणि माझा घे तुला
दे तुझा झोकून घेतो
आणि माझा घे तुला
होत जागी
होत जागी रानगीते
हृदय लागे गुणगुणू
दोन हे आहेत पेले
आपुले नाही जणू
दोन हे आहेत पेले

दोन धारा एक झाल्या
दोन धारा एक झाल्या
या प्रवाही तू नी मी
पूर येतो वाढणारा
आपुली ना ही तनू
दोन हे आहेत पेले
आपुले नाही जणू
दोन हे आहेत पेले

दोन हे आहेत पेले
एक माझा संपला
दोन हे आहेत पेले
एक माझा संपला
झाकूनी अर्धाच पेला
टेकली का वर हनू
दोन हे आहेत पेले
आपुले नाही जणू
कोणता आहे तुझा
अन् कोणता माझा म्हणू
दोन हे आहेत पेले

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*